नि.दि.दावा क्र. ६८१/२०२१
शिवनंदा विरुध्द जगन्नाथ
नि.क्र.४९

<u>**प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्रमांक ०४ चा जबाब.**</u>

साक्षीदाराचे नावः– **अविनाश गंगाधर कमलापुरे.**

वयः– **३४ वर्षे,** धंदाः– **शेती,**

राहणारः– **तळेगाव बोरी, तालुका शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर.**

<u>**प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. जी. आर. साळुंके यांचेमार्फत साक्षीदाराचा सरतपास शपथेवर सुरु.**</u>

१. मी प्रतिवादी क्र.०१, ०४ आणि वादीला यांना ओळखतो. मी प्रतिवादी क्र.०१ कडून सर्वे क्र.६९ मधील ४५ आर जमीन सन २००८ मध्ये खरेदी घेतली होती. प्रतिवादी क्र.४ ही प्रतिवादी क्र. १ ची पत्नी आहे. तसेच वादी ही प्रतिवादी क्र.१ ची मुलगी आहे. त्या मिळकीचे खरेदीपत्र मी ओळखू शकतो. (आता मला नि.क्र.३८ वरील दिनांक १८.०३.२००८ रोजीचे खरेदीपत्र दाखविण्यात आले.) त्या खरेदीपत्रामध्ये संमती देणार अंजना जगन्नाथ कमलापूरे आणि शिवनंदा जगन्नाथ कमलापूरे म्हणून नाव नोंद आहे. त्या खरेदीपत्रावर माझी सही आहे. लिहून देणार म्हणून प्रतिवादी क्र.१ ची सही आहे. तसेच संमती देणार म्हणून वादी आणि प्रतिवादी क्र.४ ची सही आहे. सदर खरेदीपत्रास साक्षीदार म्हणून शेषेराव नामदेवराव सुगावे आणि विठ्ठल भागवतराव बुरंगे, माधव विश्वनाथ कमलापूरे, शंकर संगप्पा कमलापूरे, भागवत उद्धवराव एकुर्गे, ज्ञानोबा निवृत्ती एकुर्गे यांच्या सह्या आहेत. प्रतिवादी क्र.१ ने वादीच्या लग्न खर्चाकरीता आणि घर खर्चाकरीता मला नि.क्र.३८ मधील जमीन विक्री केली. त्या खरेदीपत्रामधील मजकूर बरोबर आहे.

**उलटतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री. एम. के. वलांडे यांचेमार्फत शपथेवर सुरु.**

०२. आजरोजी न्यायालयामध्ये सोहम हा हजर आहे. तो प्रतिवादी क्र.०१ व ०४ चा मुलगा आहे. माझी जन्म तारीख दिनांक ०९.१०.१९९० ही आहे. वादी ही माझ्या चुलत भावाची मुलगी असून माझ्या पेक्षा लहान आहे. ती माझ्या पेक्षा एक–दोन वर्षांनी लहान आहे. नि.क्र.३८ वरील खरेदीपत्रावेळी वादी सज्ञान असल्याबाबतचा पुरावा मी घेतला नव्हता. नि.क्र.३८ वरील खरेदीपत्र पुर्ण लिहून झाल्यानंतर शिवनंदा हिचे नाव लिहीले आहे. शिवनंदाच्या लग्नाच्याकरीता जमीन विक्री केली असे नि.क्र.३८ मध्ये नमूद नाही. प्रतिवादी क्र.३ ही प्रतिवादी क्र.१ ची मुलगी आहे. प्रतिवादी यांना शेत मिळकतीशिवाय अन्य कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. नि.क्र.३८ मधील जमीन सोडून उर्वरीत सर्वे क्र. ६९ मधील जमीन प्रतिवादी क्र.१ च्या ताब्यात आहे. नि.क्र.३८ वरील खरेदीपत्रावेळी वादी ही अज्ञान होती. हे म्हणणे खरे नाही की, शिवनंदा हिच्या लग्नाच्या खर्चाकरीता खरेदीपत्र केले होते असे मी सरतपासात खोटे सांगितले.

**उलटतपास पूर्ण.**

**फेर तपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत,

Digitally signed by GUNJAVATE APARNA SHIVAJI
Date: 2025.06.27 17:46:12 +0530

**(श्रीमती ए.एस.गुंजवटे)**

**दिनांकः– २७/०६/२०२५.** **सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, निलंगा.**

**ठिकाणः– निलंगा.** **जिल्हा लातूर.**